वसई-विरार महानगरपालिका
सार्वत्रिक निवडणूक २०१५ व इतर
महानगरपालिकांमधील रिक्त पदांच्या
पोटनिवडणुका - निवडणूक कार्यक्रम

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य
ई-मेल

क्रमांक : रानिआ/मनपा २०१५/प्र.क्र. १२/का.०५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १६.०५.२०१५

प्रति,
आयुक्त,
वसई-विरार, अहमदनगर, उल्हासनगर,
मिरा-भाईंदर, मालेगाव, सोलापूर व
परभणी महानगरपालिका.

विषय :- वसई-विरार महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१५ व इतर महानगरपालिकांमधील रिक्त पदांच्या पोटनिवडणुका -निवडणूक कार्यक्रम

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे. यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.५७५६/२००५, (श्री.किशनसिंग तोमर विरुध्द अहमदाबाद महानगरपालिका व इतर) या याचिकेमध्ये दि.१९/१०/२००६ रोजी खालीलप्रमाणे महत्वपूर्ण निवाडा दिलेला आहे :-

(अ) राज्य निवडणूक आयोग यांचे अधिकार, शक्ती व दर्जा भारत निवडणूक आयोगाच्या समकक्ष आहेत.

(आ) राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक ती सर्व साधनसामग्री व मनुष्यबळ राज्य शासनाने उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

(इ) राज्य निवडणूक आयोगाने दिलेले निर्देश राज्य शासनावर बंधनकारक आहेत. इत्यादी.

कायद्याची वरील तरतुद लक्षात घेता निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्यावेळी ज्याप्रमाणे कार्यवाही केली जाते त्याप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्यावेळी सर्व आवश्यक बाबींवर कार्यवाही केली जाणे आवश्यक आहे. तरी त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल याची महानगरपालिका आयुक्त यांनी दक्षता घ्यावी.

२. आयोगाच्या क्र. रानिआ/मनपा २०१५/प्र.क्र.०५/का.०५, दि.२९.०४.२०१५ च्या पत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट १ व आयोगाच्या समक्रमांकाच्या दि.०६.०५.२०१५ च्या पत्रानुसार वसई-विरार महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी व इतर महानगरपालिकांमधील रिक्त पदांच्या पोटनिवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम देण्यात आलेला आहे. त्यानुसार महाऑनलाईनने तयार केलेल्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून मतदार यादी तयार करुन दि.२१.०५.२०१५ रोजी प्रसिध्द करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

३. निवडणूक कार्यक्रम

३.१ वसई-विरार महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता तसेच परिशिष्ट-१ मध्ये नमूद करण्यात आलेल्या महानगरपालिकांमधील रिक्त पदांच्या पोट निवडणुकीकरिता परिशिष्ट-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवडणुकीचा कार्यक्रम देण्यात येत आहे. त्यानुसार महानगरपालिका आयुक्त यांनी संबंधित अधिनियम व निवडणूक नियमांमधील तरतुदीनुसार निवडणूक कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या वेळापत्रकानुसार प्रसिध्द करावा.

३.२ या पत्रान्वये कळविलेल्या पोट निवडणुकीबाबत न्यायालयाचे स्थगिती आदेश किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे आदेश प्राप्त झाल्यास त्याची अंमलबजावणी तात्काळ करावी व राज्य निवडणूक आयोगास तसे ई-मेल व फॅक्सद्वारे कळविण्यात यावे.

४. निवडणूकविषयक कामकाजासाठी आवश्यक अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती

४.१ आयोगाच्या क्र.रानिआ/मनपा २०१५ /प्र.क्र.६/का.०५, दि.१०/०२/२०१५ च्या आदेशानुसार महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीची सर्व जबाबदारी महानगरपालिका आयुक्त यांचेवर राहील. त्यांनी त्यांचे सोयीप्रमाणे एका विशिष्ट उपआयुक्त यांना या कामासाठी नियुक्त करावे.

४.२ आयोगाच्या क्र. एसईसी१०९५/३०६/डेस्क३, दि.२ मार्च, १९९५ च्या आदेशानुसार महानगरपालिका आयुक्त हे निवडणुकीच्या कामाकरिता कर्मचारी अधिग्रहीत करण्यास सक्षम प्राधिकारी आहेत. त्यानुसार त्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, क्षेत्रिय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष व इतर मतदान अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्त्या कराव्यात.

४.३ आचारसंहिता कालावधीत निवडणुकीशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्या करण्यात येऊ नयेत.

४.४ निवडणुकीच्या कालावधीत निवडणुकीशी संबंधित अधिकारी/कर्मचारी हे राज्य निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर राहतील.

४.५ निवडणुकांची सर्व कामे व्यवस्थित पार पडतील याची सर्व संबंधितांनी काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामध्ये जाणीवपूर्वक हयगय झाल्यास संबंधित अधिकारी/ कर्मचारी ( महानगरपालिका आयुक्त यांच्यासह) यांच्याविरुध्द उचित कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार राज्य निवडणूक आयोगास राहतील.

५.निवडणूक कामकाजासाठी नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण

महानगरपालिका आयुक्त यांनी निवडणूक कामकाजासाठी नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना निवडणूक कामकाजाची माहिती होण्याकरिता किमान ३ वेळा प्रशिक्षण आयोजित करावे.

६. आचारसंहिता

६.१ ज्या महानगरपालिकांची सार्वत्रिक / पोट निवडणूक घ्यावयाची आहे, त्या संबंधित क्षेत्रात आज मध्यरात्री १२.०० पासून निवडणूक आचारसंहिता लागू होईल. ही आचारसंहिता निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. याबाबत आयोगाचे क्र.स्वास्वसं २०११/प्र.क्र.२५/का.५, दि.२९/१२/२०११ मधील तरतुदींचे सर्वतोपरी पालन होईल याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

६.२ प्रसिध्दी माध्यमांमध्ये येणाऱ्या **पेड न्यूज**बाबत राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक-रानिआ/मनपा/२००९/प्र.क्र.१/का.०५, दिनांक २२ डिसेंबर, २०११ व दिनांक १६ जानेवारी, २०१२ रोजीच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

७. नामनिर्देशनपत्र व त्यासोबत इतर कागदपत्रे सादर करण्याच्या प्रक्रियेचे संगणकीकरण

उमेदवारांची सर्व माहिती व्यवस्थितरित्या संकलित व्हावी यासाठी राज्य निवडणूक आयोगाने महाऑनलाईनच्या मदतीने एक सॉफ्टवेअर तयार केले आहे. या संगणक प्रणालीद्वारे सर्व उमेदवारांनी त्यांचे नामनिर्देशनपत्र भरावे. त्याचे प्रिंट आऊट घेऊन त्यावर स्वाक्षरी करावी. असे स्वाक्षरी केलेले प्रिंट आऊट नामनिर्देशनपत्र म्हणून निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने दाखल करावे. नामनिर्देशनपत्रासोबत देण्यात येणारी शपथपत्रे व इतर जोडपत्रे संगणक प्रणालीवर न भरता थेट वरील नामनिर्देशपत्राच्या स्वाक्षरी केलेल्या संगणकीय प्रिंट आऊटसोबत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करावे. नामनिर्देशनपत्र दाखल करुन घेतेवेळी अर्जासोबत जोडावयाची शपथपत्रे व जोडपत्रे त्याचदिवशी संगणक प्रणालीवर अपलोड करण्याची जबाबदारी निवडणूक निर्णय अधिकारी यांची असेल.

८. शपथपत्रे

८.१ उमेदवाराने नामनिर्देशनपत्र दाखल करताना आयोगाचे क्र.एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र.२९/का.१०, दि. ३१/०३/२००९ अपत्याबाबतचे विहित नमुन्यातील शपथपत्र व क्र.एसईसी/ जीईएन/ २००२/ प्र.क्र.८५/का.०५, दि.१५/०३/२००४ व दि.०७/०७/२००८ (शुध्दीपत्रक) अन्वये विहित केल्यानुसार उमेदवारांच्या संपत्तीबाबतचे तसेच गुन्हेगारी

पार्श्वभूमीबाबतचे विहित नमुन्यातील शपथपत्र सादर करणे बंधनकारक आहे. शपथपत्राचे नमुने उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासोबत उपलब्ध करुन देण्यात यावेत. आयोगाच्या क्र. रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र.२२/का.०५, दि.०८/०१/२०१५ च्या आदेशानुसार अशी शपथपत्रे स्टॅम्प पेपरवर सादर करण्याची आवश्यकता नाही.

८.२ नामनिर्देशनपत्रासोबत जोडावयाच्या शपथपत्रातील कोणत्याही रकान्यात माहिती न भरल्यास आयोगाच्या क्र.रानिआ/नप २०१५/प्र.क्र.५/का.०६, दि.२७/०३/२०१५ च्या पत्रासोबतच्या भारत निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-५७६/३/२०१३-एसडीआर, दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ मध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कार्यवाही करावी. याबाबत सर्व राजकीय पक्षांना माहिती देण्याकरिता आवश्यक त्या उपाययोजना सर्व महानगरपालिका आयुक्त यांनी कराव्यात.

८.३ राखीव प्रभागातून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि नगरविकास विभागाच्या क्र.१३/२०१५, दि.०७.०४.२०१५ च्या अधिसुचनेनुसार ज्या सार्वत्रिक/पोट निवडणुकांकरिता नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक ३१ डिसेंबर २०१७ किंवा त्यापूर्वीचा असेल, त्याबाबतीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरीकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींना वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी त्यांनी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा अन्य कोणत्याही अर्जाची सत्यप्रत किंवा अन्य कोणताही पुरावा नामनिर्देशन पत्रासोबत सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा उमेदवारांनी निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्याबाबत तरतुद केली आहे.

## ९. नामनिर्देशनपत्र मागे घेणे तसेच बिनविरोध निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास विजयी घोषित करण्याबाबत

निवडणुकांचेवेळी उमेदवारी अर्ज भरताना अनेक उमेदवार अर्ज भरतात, परंतु नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्यावेळी एक उमेदवार सोडून अन्य सर्व उमेदवार अर्ज मागे घेतात. अशावेळी तो उमेदवार

इतर उमेदवारांवर दबाव आणून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास लावतो ही शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे यापुढे असे प्रसंग घडल्यास राज्य निवडणूक आयोगास त्याबाबत सविस्तर अहवाल तात्काळ पाठवावा व राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिल्यानंतरच त्या उमेदवाराला विजयी घोषित करावे. याबाबत आयोगाचे क्र. रानिआ/मनपा२००४/प्र.क्र.३७/का.०५, दि.२३/१२/२००४ च्या आदेशाचे पालन करावे.

**१०. निवडणुकीमध्ये उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा तसेच खर्चाचा हिशोब सादर करण्याबाबत :-**

१०.१ आयोगाचे क्र.रानिआ/मनपा२००६/प्र.क्र.१७/का.०५, दि.३० जुलै, २०११ अन्वये उमेदवारांनी करावयाच्या खर्चाची मर्यादा निश्चित केली आहे. तसेच क्र. एसईसी१०९५/१०१/डेस्क ३, दि.७ फेब्रुवारी, १९९५ च्या आदेशानुसार उमेदवाराने दैनंदिन खर्चाचा हिशोब तसेच निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत एकत्रित खर्चाचा तपशील संबंधित महानगरपालिका आयुक्त, किंवा महानगरपालिका आयुक्त प्राधिकृत करतील अशा उपायुक्त दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याकडे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने सादर करावयाचा आहे. बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारानेसुध्दा खर्चाचा हिशोब सादर करणे आवश्यक राहील.

१०.२ विहित कालावधीत निवडणूक खर्चाचा तपशील सादर न करणाऱ्या व्यक्तीस महानगरपालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा महानगरपालिका सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास निरर्ह ठरविण्यात येईल. ही बाब उमेदवारांच्या निर्दशनास आणून देण्यात यावी. आयोगाचे आदेश क्र. रानिआ/नप/२००९/प्र.क्र.१३/का.०५ व का.०६, दि.०५.०६.२०१० अन्वये खर्चाची माहिती विहित वेळेत सादर न करणा-या उमेदवाराला अनर्ह ठरविण्याचे अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आले असून आवश्यक कार्यवाही करण्यासाठी अशा उमेदवारांची माहिती विहित वेळेत विभागीय आयुक्तांना पाठवावी व त्याबाबतचा अहवाल आयोगास कळवावा. तसेच याबाबत आयोगाचे क्र. रानिआ/मनपा २०१५/प्र.क्र.०८/का.०५, दि.२३.०२.२०१५ चे पत्र कृपया पहावे.

११. मतदान केंद्र निश्चिती

आयोगाने मतदान केंद्र निश्चितीबाबत विहित केलेल्या निकषांनुसार मतदान केंद्र निश्चित करावे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीकरिता मतदाराचे नाव ज्या मतदान केंद्रावर होते त्याच मतदान केंद्रावर शक्यतोवर (मतदान केंद्राची इमारत) महानगरपालिका निवडणुकीमध्ये मतदाराचे नाव राहील यादृष्टीने प्रत्येक मतदान केंद्राला १२०० ते १४०० मतदार जोडण्यात यावेत. मतदान केंद्रांवरील सर्व सोयीसुविधा लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे असतील याची खबरदारी घेण्यात यावी.

**१२. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व मार्कर पेन यांच्या वापराबाबत तसेच पितळी सील पुरवठयाबाबत**

१२.१ या निवडणूका इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर घेण्यात येतील. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या वापराबाबत आयोगाचे दि.०७ जानेवारी, २००५, दि.१२ नोव्हेंबर, २०१३, दि.२६ नोव्हेंबर, २०१३ च्या आदेशानुसार कार्यवाही करावी.

१२.२ मार्कर पेनने मतदाराच्या बोटाला निशाणी करण्याबाबत आयोगाच्या क्रमांक- रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.१०/का.०५, दि.१९.११.२०११ च्या पत्रातील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच ही मार्कर पेन वापरण्यायोग्य **विहित मुदतीतील असल्याबाबत** आपल्या स्तरावर खातरजमा करण्यात यावी.

१२.३ संबधित विभागीय आयुक्त यांनी आवश्यकतेनुसार संबंधित आयुक्त, महानगरपालिका यांना पितळी सील वेळेत पुरवावेत.

**१३. मतदार यादीतील मयत अथवा स्थानांतरीत मतदारांबाबत तसेच दुबार नावांबाबत करावयाची कार्यवाही**

यासंदर्भात आयोगाच्या दि.११/१०/२०१० व दि. ०७/०२/२०१२ च्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१४. मतदारांना व्होटर स्लीपचे वाटप करण्याबाबत

लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदारांना बीएलओमार्फत फोटो असलेल्या व्होटर स्लीपचे वाटप करण्यात यावे.

१५. निवडणूकविषयक अहवाल आयोगास सादर करण्याबाबत

१५.१ महानगरपालिका आयुक्त यांनी संबंधित अधिनियम व निवडणूक नियमांमधील तरतुदीनुसार निवडणूक कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या वेळापत्रकानुसार प्रसिध्द करावा. निवडणुका मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने कायदा व सुव्यवस्थेसह आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी. निवडणुकीतील टप्पे राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या तारखेस पार पाडावेत व यासंदर्भातील माहिती महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी. तसेच प्रत्येक टप्पा पार पाडल्यानंतर त्याबाबतची माहिती राज्य निवडणूक आयोगास फॅक्स व ई-मेलद्वारे तात्काळ पाठवावी.

१५.२ राज्य निवडणूक आयोगाच्या दि.१/१२/२००४ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार खोटे मतदान करणे, जबरदस्तीने मतदान केंद्रांचा ताबा घेणे, मतदान यंत्रांवर जबरदस्तीने मते नोंदविणे, गाळलेल्या मतदारांच्या यादीतील लोकांना मतदान करु देणे यासारख्या सर्व महत्वाच्या घटना अथवा गैरप्रकार राज्य निवडणूक आयोगाला ताबडतोब कळविण्याची दक्षता घ्यावी.

१५.३ याबाबत आयोगाकडून निवडणूक कार्यक्रमादरम्यान व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे वेळोवेळी आढावा घेण्यात येईल. उपरोक्त अहवाल उशिरा च चुकीचे प्राप्त असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत संबंधित महानगरपालिका आयुक्त यांना जबाबदार धरण्यात येईल.

१६. निवडून आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करण्याबाबत

उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यात आल्यावर निवडणूक नियमातील तरतुदीनुसार सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिका आयुक्त यांनी विहित कालावधीत पूर्ण करावी व त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

१७. राज्य निवडणूक आयोगाकडील संपर्क क्रमांक

राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील फॅक्स क्रमांक, दूरध्वनी क्रमांक तसेच ई-मेल ॲड्रेस पुढीलप्रमाणे आहेत :-

फॅक्स क्रमांक :- २२८४६७२१
दूरध्वनी क्रमांक:-२२०४५०७५ / २२०२७७३७ / २२८४६७२०
ई-मेल :-sec.mh@gov .in

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( नि. ज. वागळे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्रे :- परिशिष्ट १ व २

प्रत:-
१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई-३२
२) अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
त्यांना विनंती करण्यात येते की, संबंधित पोलिस आयुक्त व जिल्हा पोलिस अधिक्षक यांना आवश्यकतेनुसार पोलिस दल उपलब्ध करुन देण्याच्या सूचना द्याव्यात.
३) प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५) विभागीय आयुक्त,कोकण विभाग, नाशिक विभाग, औरंगाबाद विभाग, पुणे विभाग
६) जिल्हाधिकारी, पालघर, अहमदनगर, ठाणे, नाशिक, सोलापूर, परभणी
७) पोलिस आयुक्त, ठाणे व सोलापूर
८) पोलिस अधिक्षक, ठाणे (ग्रामीण), पालघर, अहमदनगर, नाशिक, परभणी.
९)संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-४
१०)माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
११) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने,
१२) निवड नस्ती

( राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/मनपा २०१५/प्र.क्र.१२ /का.५, दि. १६.०५.२०१५ सोबतचे सहपत्र

परिशिष्ट-१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ ( १९४९ चा मुंबई ५९ च्या ) अंतर्गत
अहमदनगर, उल्हासनगर, मिरा-भाईंदर,
मालेगाव, सोलापूर व परभणी महानगरपालिकांमधील रिक्त पदांचे विवरणपत्र

| अ.क्र. | महानगरपालिकेचे नाव | सदस्याचे नाव | प्रभाग क्रमांक | पद रिक्त होण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १. | अहमदनगर | श्रीमती विजया अजय दिघे | १०-अ | निधन |
| २. | उल्हासनगर | श्री. जाफरअली जोहर अली चौधरी | ६-अ | जात प्रमाणपत्र अवैध |
| ३. | मिरा-भाईंदर | श्रीमती दिप्ती भट्ट | ३८-अ | राजीनामा |
| ४. | मालेगाव | श्रीमती शगुफ्ता शेख शफिक | ८-अ | अनर्ह |
| ५. | मालेगाव | श्री. नवीद अहमद खतीब मुश्ताक अहमद | ४-अ | जात प्रमाणपत्र अवैध |
| ६. | सोलापूर | श्रीमती दमयंती भोसले | ४-ब | निधन |
| ७. | सोलापूर | श्री. महेश विष्णूपंत कोठे | १८-ब | अनर्ह |
| ८. | परभणी | स. खालेद स.साहेब जान | ६-ब | निधन |

( नि.ज.वागळे )
अवर सचिव ,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

D:\Corpn २०१४-१५\Election २०१४-१५ Feb..docx

( राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/मनपा २०१५/प्र.क्र.१२ /का.५, दि. १६.०५.२०१५ सोबतचे सहपत्र

## परिशिष्ट-२

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ ( १९४९ चा मुंबई ५९ व्या ) अंतर्गत**
**वसई-विरार महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक व अहमदनगर, उल्हासनगर, मिरा-भाईंदर,**
**मालेगाव, सोलापूर व परभणी महानगरपालिकांमधील रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी कार्यक्रम**

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | आयुक्त, महानगरपालिका यांनी निवडणूक कार्यक्रम शासन राजपत्र व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याची तारीख | २२/०५/२०१५ (शुक्रवार) |
| २ | नामनिर्देशनपत्र देणे | २२/०५/२०१५ (शुक्रवार) ते २८/०५/२०१५ (गुरुवार) (सकाळी ११.०० ते दु.३.००) तसेच २९/०५/२०१५ (शुक्रवार) (सकाळी ११.०० ते दु.२.०० या वेळेत नामनिर्देशनपत्र देण्यात येतील.) **( रविवार दि.२४/०५/२०१५ रोजी नामनिर्देशनपत्रे देण्यात येणार नाहीत.)** |
| ३ | नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | २२/०५/२०१५ (शुक्रवार) ते २९/०५/२०१५ (शुक्रवार) (सकाळी ११.०० ते दु.३.००) **(रविवार दि.२४/०५/२०१५ रोजी नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत.)** |
| ४ | नामनिर्देशनपत्रांची छाननी | ३०/०५/२०१५ (शनिवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ५ | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच |
| ६ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | ०१/०६/२०१५ ( सोमवार) (दुपारी ३.०० पर्यंत) |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | ०२/०६/२०१५ (मंगळवार) (सकाळी ११.०० पासून) |
| ८-अ | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०२/०६/२०१५ (मंगळवार) |
| ८-ब | मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द करणे | ०२/०६/२०१५ (मंगळवार) |
| ८-क | महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | ०२/०६/२०१५ (मंगळवार) |
| ९ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | १४/०६/२०१५ (रविवार) (सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत) |
| १० | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | १६/०६/२०१५ (मंगळवार) सकाळी १०.०० पासून |
| ११ | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | १८/०६/२०१५ (गुरुवार) रोजी किंवा तत्पूर्वी |

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( नि.ज.वागळे )
अवर सचिव ,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

D:\Corpn २०१४-१५\Election २०१४-१५ Feb..docx